UFO MOVIEZ INDIA LIMITED
Publication:Gomantak, Goa, Date: 24 Nov.,2010

"वर्ष - दीड वर्षात येणाऱ्या थ्रीडी चित्रपटांच्या पार्श्वभूमीवर येत्या मार्चपर्यंत देशातील पाचशे चित्रपटगृहांत थ्रीडी पडदे (स्क्रीन्स) उपलब्ध केले जातील. सध्या सत्तर चित्रपटगृहांतच ही सोय आहे. थ्रीडी चित्रपटगृहे नसल्याने भारतात थ्रीडी चित्रपट निर्मिती होत नव्हती. त्यासाठी आता कंपनीने गुंतवणूक करण्याचे ठरविले आहे. कंपनीच्या या घोषणेनंतर २० सिनेनिर्मात्यांनी अशा चित्रपटांच्या निर्मितीची घोषणा केली आहे. या चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी तीस ते चाळीस टक्के खर्च वाढणार आहे. युफो कंपनी चित्रपट वितरकांकडून चित्रपट मिळाल्यानंतर त्याचे डिजिटल रूपांतर करते. उपग्रहाच्या माध्यमातून तो चित्रपट अनेक शहरात एकाचवेळी वितरित केला जातो."

राजेश मिश्रा, मुख्य कार्यकारी अधिकारी युफो, डिजिटल सिनेमा कंपनी